MHST060001872023

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ४६/२०२३</u>**
**जनार्दन शंकर जाधव – वादी**
**विरुध्द**
**चंद्रहास शंकर जाधव व १ — प्रतिवादी**

## <u>निशाणी १६ वरील आदेश</u>

प्रस्तूतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्याच्या सरनाम्यात दुरूस्ती होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीने सदरच्या अर्जात असे कथन केले आहे की, वादीने सदरचा दावा हा दावामिळकती मालकी वहिवाटीचे आहे असा जाहिर ठराव व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. सदरचा दावा दाखल करतेवेळी दाव्यातील मिळकतीचा जुना गट नंबर व सर्वे नंबर नजर चुकीने दाव्यात नमुद करायचा राहून गेलेचे कथन करून वादीने प्रस्तुत दाव्यात दुरूस्ती करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असल्याचे कथन केले आहे. सबब, वादीने दाव्याचे परिच्छेद क्रमांक २ मधील संपूर्ण मजकुराऐवजी प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे परिच्छेद कमांक २) व २अ) त्यामधील संपूर्ण मजकुर लिहिण्यास परवानगी मिळून दुरूस्ती करण्याची विनंती वादीने केली आहे. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर दुरूस्तीमुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचे कशानेही न भरून येणारे नुकसान होणार आहे. सदर दुरूस्तीमुळे दावा गुणदोषावर चालण्यास मदत होणार आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे वादींनी सदरचा दुरूस्ती अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तूत अर्जावर आपले म्हणणे निशाणी क्रमांक २० अन्वये दाखल करून सदर अर्जातील वादीची सर्व कथने नाकारली आहेत. वादीने पुढे

असेही कथन केले आहे की, दावा दाखल करताना वादीने मूळ अभिलेख दाखल करणे गरजेचे होते, प्रस्तुत दावा चौकशीकरीता प्रलंबित आहे, दावामिळकतीशी वादीचा कायदेशरी हितसंबंध व कब्जा वहिवाट नाही. प्रतिवादींनी पुढे कथन केले आहे की, वादी यांनी सदरच्या अर्जात केलेली मागणी बेकायदेशीर असून विलंबाबद्दल कोणतेही कायदेशीर कारण अर्जात नमुद नसल्यामुळे वादीचा सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. संपुर्ण प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणात मागण्यात आलेली दुरुस्ती ही दावामिळकतीचा जुना गट नंबर व सर्व्हे नंबर नमूद करून दावामिळकतीची ओळख स्पष्ट करण्यापुरती मर्यादित आहे. सदर दुरुस्तीच्या अनुषंगाने वादींकडून कोणताही नवीन स्वरूपाचा दावा निर्माण होत नाही. तसेच, दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरूप अथवा वादीच्या मागणीत बदल होत नाही. प्रतिवादींनी घेतलेल्या हरकती या प्रामुख्याने वादींच्या हक्क, कब्जेवहिवाट, कायदेशीर हितसंबंध व दावामिळकतीशी संबंधित गुणदोषांच्या बाबींशी संबंधित आहेत. त्या सर्व बाबींचा निर्णय वादी व प्रतिवादींनी सादर केलेल्या कागदोपत्री व तोंडी पुराव्याच्या आधारे दाव्याच्या अंतिम सुनावणीच्या वेळी करण्यात येईल. केवळ त्या कारणावरून दावामिळकतीची ओळख स्पष्ट करणारी दुरुस्ती नाकारण्याचे कारण दिसून येत नाही.

५. प्रस्तुत दुरुस्तीमुळे प्रतिवादींच्या बचावाचा अधिकार हिरावून घेतला जात नाही. उलट, दावामिळकतीची अचूक ओळख स्पष्ट झाल्यामुळे व दुरूस्ती झाल्यास गुणवत्तेवर प्रकरणाचा न्यायनिर्णय व अंतिम निर्णय देणे वादी व प्रतिवादींसाठी न्यायोचित होईल. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी यांचे कसलेही नुकसान संभवत नाही. अर्जात नमुद कारण हे संयुक्तीक असल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. तसेच प्रतिवादींना दुरुस्तीच्या अनुषंगाने आवश्यक असल्यास त्यांचा अतिरिक्त लेखी जबाब दाखल करण्याची संधी देणे न्याय्य राहील. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा निशाणी क्रमांक १६ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींना दाव्याच्या परिच्छेद क्रमांक २ मधील मजकुराऐवजी प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे सुधारित परिच्छेद क्रमांक २ व २–अ समाविष्ट करून दाव्यात आवश्यक दुरुस्ती करण्यास रूपये ३००/– खर्चाच्या अधीन राहून परवानगी देण्यात येते.

३. सदरचा रूपये ३००/– खर्च हा प्रतिवादी यांना अदा करण्यात यावा.

४. वादी यांनी १४ दिवसांचे आत प्रस्तावित दुरुस्ती मुळ दाव्यात करुन दुरुस्ती प्रत सादर करावी.

५. प्रतिवादींना दुरुस्तीच्या अनुषंगाने आवश्यक असल्यास त्यांचा अतिरिक्त लेखी जबाब दाखल करण्याची संधी देणेत येते.

सही/–
(श्रीमती ए. वाय. शेख)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, दहिवडी.

दिनांक – ११/०८/२०२६
ठिकाण – दहिवडी